# विद्यार्थी संघटनांनी नामनिर्देशित प्रतिनिधी अधिसभेवर घ्यावेत

## विविध सूचना : कायदा उपसमितीला सादर

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : विद्यार्थी परिषदांमध्ये प्रतिनिधित्वासाठी 'संशोधन आणि विकास' या स्वतंत्र विभागाचा समावेश करावा. विद्यार्थी परिषद आणि अधिसभा सदस्य म्हणून जाण्यासाठी राष्ट्रीय दर्जा असणाऱ्या पक्षांच्या अधिकृत विद्यार्थी संघटनांनी नामनिर्देशित केलेले विद्यार्थी प्रतिनिधी घेण्यात यावेत, अशा विविध सूचना विद्यार्थी संघटनांनी मंगळवारी शिवाजी विद्यापीठात केल्या.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम - २०१६ मध्ये सुधारणा करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली 'महाराष्ट्र राज्य विद्यापीठ कायदा मूल्यमापन समिती' ही उपसमिती स्थापन केली आहे. या समितीने मंगळवारी विविध विद्यार्थी संघटनांचे पदाधिकारी, प्रतिनिधींच्या सूचना जाणून घेतल्या.

कोल्हापूर युवक काँग्रेसच्या अभिषेक मिठारी यांनी विद्यार्थी परिषदांमध्ये अल्पसंख्याक समाजाचे प्रतिनिधी असावेत. अपंग आणि एलजीबीटीक्यू घटकांचे प्रतिनिधित्व असावे, आदी सूचना मांडल्या. मनविसेचे मंदार पाटील यांनी विद्यार्थ्यांना केंद्र मानून नवीन कायदे व्हावेत, असे सांगितले. मराठा आरक्षण विद्यार्थी कृती समितीचे ऋतुराज माने यांनी राष्ट्रीय दर्जा असणाऱ्या पक्षांच्या अधिकृत विद्यार्थी संघटनांनी नामनिर्देशित केलेले विद्यार्थी प्रतिनिधी घेतले जावेत, अशी सूचना मांडली. दहावी, बारावी, पदवी शिक्षण यांमध्ये जसे क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रांसाठी विशेष कोटा असतो तसा कोटा पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठीही असावा, अशी सूचना महेश राठोड यांनी केली. यावेळी सिद्धांत गुंडाळे, राजवर्धन बिरंजे, आदी उपस्थित होते.

### अकरा प्राधिकरणांवर प्रतिनिधी नेमावेत

विद्यापरिषद, विद्याशाखा, विद्यापीठ उपपरिसर मंडळ, अभ्यास मंडळे, आजीवन अध्ययन व विस्तार, परीक्षा व मूल्यमापन, माहिती व तंत्रज्ञान, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सहचर मंडळ, नवोपक्रम व संशोधन मंडळ, आदी ११ प्राधिकरणांवर विद्यार्थी प्रतिनिधी नेमावेत, आदी विविध २४ सूचना अभिषेक मिठारी यांनी मांडल्या.

# कायदा विद्यार्थी हिताचा असावा

## विद्यापीठ कायदा मूल्यमापन समितीसमोर विद्यार्थी संघटनांनी केल्या सूचना

प्रतिनिधी
कोल्हापूर

केंद्राच्या नूतन शैक्षणिक धोरणानुसार राज्य शासनाच्या सार्वजनिक विद्यापीठ कायद्यामध्ये काय बदल असावे, यासंदर्भात विविध विद्यार्थी संघटनांनी विद्यापीठ कायदा विद्यार्थ्यांच्या हिताचा असावा, अशा सूचना केल्या. दिवसभर विद्यापीठ अधिविभागांसह अन्य घटकांनी विद्यापीठ कायद्यासंदर्भात सूचना केल्या. दोन दिवस महाराष्ट्र राज्य विद्यापीठ कायदा मूल्यमापन समितीने विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्वच घटकांच्या सूचना लिखित स्वरूपात घेतल्या आहेत. यातील काही चांगल्या सूचनांचा विचार करून कायद्यात रूपांतरीत होण्याची शक्यता आहे.

- विद्यापीठात संशोधनातील पेटंटसंदर्भात कंपनीची स्थापना करावी
- विज्ञान अधिविभागप्रमुखांची सूचना



मराठा आरक्षण विद्यार्थी कृती समिती ऋतुराज माने म्हणाले, विद्यापीठ निवडणुकात एक वर्षापेक्षा कमी कालावधी मिळतो. सर्व विद्यार्थी संघटनांमधून एक कुलगुरू नामनिर्देशित सदस्य निवडावा. शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावे. शिवाजी विद्यापीठ आजी–माजी विद्यार्थी कृती समितीचे महेश जाधव म्हणाले, पदव्युत्तर प्रवेशामध्ये क्रीडा विभागातील विद्यार्थ्यांना आरक्षण असावे. मनसे विद्यार्थी संघटनेचे मंदार पाटील म्हणाले, आंतर विद्याशाखीय अभ्यास मंडळात आंतरविद्याशाखेबद्दल माहिती असणाऱ्या व सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या सदस्याची नियुक्ती करावी. प्रासंगिक रिक्त पदे भरण्यासाठी असलेल्या स्थायी समितीमध्ये विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचा अध्यक्ष सदस्य असला पाहिजे. याप्रसंगी राष्ट्रवादी युवक काँग्रेस, युवा सेनेच्या कार्यकर्त्यांनी सर्व सूचनांना संमती दिली.

### विद्यापीठ अंतर्गत कंपनीची स्थापना करावी

विद्यापीठात विविध विषयावर आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधन केले जाते. परंतु पेटंट मिळवण्यासाठी संशोधकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे विद्यापीठात सर्व विज्ञान अधिविभागांसाठी विद्यापीठ कायदा सेक्शन ८ अंतर्गत एका कंपनीची स्थापना करावी. त्याअंतर्गत स्कूल ऑफ केमिकल सायन्सेस, स्कूल ऑफ लॅब सायन्सेस असे अनेक अभ्यासक्रम सुरू करून सर्व विभागांसाठी एका संचालकाची नियुक्ती करावी. या कंपनीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगार तर विद्यापीठ अनुदानाच्या तिजोरीत भर पडणार आहे.

### कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाची निर्मिती

शिवाजी विद्यापीठातील सामाजिक शास्त्र आणि भाषा अधिविभागात कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाची निर्मिती केली जाणार आहे. तसेच बदलत्या काळानुसार जागतिक बदल करून त्याप्रमाणे अभ्यासक्रम तयार करण्यात यावे. जेणेकरून कला शाखेचा विद्यार्थी जागतिक स्पर्धेत टिकला पाहिजे.

# विद्यापीठ कायद्यात सुधारणेसाठी युवक काँग्रेसकडून सूचना

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६'सुधारण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्यापीठ कायदा समितीच्या उपसमितीद्वारे १४ आणि १५ डिसेंबर अशी दोन दिवसीय कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेत युवक काँग्रेसच्या वतीने अभिषेक मिठारी यांनी २४ सूचना सादर केल्या

महाराष्ट्र युवक काँग्रेसचे महासचिव आणि कोल्हापूर शहर प्रभारी इंद्रजित साळुंखे यांच्या सूचनेनुसार युवक काँग्रेसच्या वतीने प्रतिनिधी म्हणून अभिषेक मिठारी यांना या कायद्याचा अभ्यास करुन काँग्रेस पक्षाच्या लोकशाहीवादी धोरणांनुसार विद्यार्थी-युवकांच्या हिताच्या दृष्टीने सूचना करण्यासाठी पाचारण करण्यात आले होते.यावेळी मिठारी यांनी सूचना मांडल्या. विद्यार्थी परिषदांमध्ये प्रतिनिधीत्वासाठी 'संशोधन आणि विकास'या स्वतंत्र विभागाचा समावेश, विद्यार्थी परिषदांमध्ये अल्पसंख्यांक समाजाचे प्रतिनिधी असावेत, विद्यार्थी परिषद व अधिसभा यांच्यावर सदस्य म्हणून जाण्यासाठी राष्ट्रीय दर्जा असणाऱ्या पक्षांच्या अधिकृत विद्यार्थी संघटनांनी नामनिर्देशित केलेले विद्यार्थी घेणे, व्यवस्थापन परिषदेमध्ये विद्यार्थी परिषद हा अध्यक्ष हा आमंत्रित असण्याऐवजी पदसिध्द सदस्य असला पाहिजे, प्रासंगिक रिक्त पदे भरण्यासाठी स्थायी समितीमध्ये विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचा अध्यक्ष असला पाहिजे आदी सूचना युवक काँग्रेसचे अभिषेक मिठारी यांनी मांडल्या आहेत असे युवक काँग्रेसचे अध्यक्ष दिपक थोरात यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळवले आहे.

# 'सीईटी' अंतिम वर्षाच्या परीक्षेला ४१ विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने अंतिम वर्ष शेवटच्या सत्रातील राज्य सामाईक प्रवेश परीक्षेस (सीईटी) बसलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा बुधवारी ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आल्या. परीक्षेला सुमारे ४१ विद्यार्थी बसले. उन्हाळी सत्रामधील अंतिम वर्ष शेवटच्या सत्रास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या लेखी परीक्षा ऑनलाईन, ऑफलाईन पद्धतीने ऑक्टोबरमध्ये विद्यापीठामार्फत घेण्यात आल्या.

जे विद्यार्थी 'सीईटी'मुळे विद्यापीठाच्या परीक्षा देऊ शकले नाहीत, अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा नंतर घेण्याबाबत महाविद्यालयांना कळविण्यात आले.

# ४१ विद्यार्थ्यांनी दिली अंतिम सत्राची परीक्षा

प्रतिनिधी
कोल्हापूर

राज्य सामाईक सीईटी परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची पदवी अंतिम सत्राची बुधवारी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेला २३३ विद्यार्थ्यांपैकी ४१ विद्यार्थी उपस्थित होते. तर १९० विद्यार्थी अनुपस्थित होते. ही परीक्षा बी. ए. बी. कॉम. बी.एस्सी अंतिम सत्रासाठी घेण्यात आली होती. या परीक्षेचा आज (दि. १७) रोजी निकाल जाहीर केला जाणार आहे. लॉच्या सीईटीचा अर्ज भरणे सोयीस्कर होईल. अर्ज भरण्यासाठी उद्यापर्यंत मुदत आहे.

**आज ऑड सेमिस्टची परीक्षा**

पदवी अंतिम सत्राच्या परीक्षेला विविध कारणाने जे विद्यार्थी अनुपस्थित होते. त्यांची आजपासून परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी ११९८ विद्यार्थ्यांनी अर्ज भरला असून, २६९ पेपर आहेत. ५० गुणांसाठी वस्तुनिष्ठ पध्दतीने ही परीक्षा ऑनलाईन होणार आहे. या परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, तरी विद्यार्थ्यांनी या वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा द्यावी.

# पदवी, पदव्युतर अंतिम सत्र गैरहजर विद्यार्थ्यांच्या परीक्षा आजपासून सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने पदवी आणि पदव्युतरच्या परीक्षेला काही तांत्रिक कारणास्तव व गैरहजर विद्यार्थ्यांच्या अंतिम वर्ष शेवटच्या सत्राच्या परीक्षा गुरुवार (दि. १७) पासून सुरू होणार आहेत. विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने परीक्षांचे नियोजन करण्यात आले आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासकीय नियमांचे पालन करण्याच्या सूचना महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., एम.कॉम, एम.एस्सी. अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र विषयाचे २६९ पेपर सुरू होणार आहेत. परीक्षेला सुमारे १ हजार ११८ विद्यार्थी बसणार आहेत. विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावरील माहिती व डेमो व्हिडीओ पाहावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.

# रेशीम शेतीतून विद्यापीठाची ग्रामीण विकासाला चालना

प्रतिनिधी
कोल्हापूर

- केंद्रीय रेशीम संशोधन संस्थेच्या अधिकाऱ्यांचे गौरवोद्गार
- शिवाजी विद्यापीठाला दिली भेट

रेशीम शेतीविषयक माहिती, तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचवून त्यांना सातत्याने आवश्यक मार्गदर्शन करणाऱ्या शिवाजी विद्यापीठाने रेशीम शेतीतून ग्रामीण विकासाला चालना दिल्याचे गौरवोद्गार केंद्रीय रेशीम संशोधन प्रशिक्षण संस्थेच्या वरिष्ठ शास्त्रज्ञांनी काढले.


केंद्रीय रेशीम संशोधन प्रशिक्षण संस्था तसेच केंद्रीय रेशीम मंडळ, म्हैसूर येथील संचालक डॉ. पंकज तिवारी, सहसंचालक तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एम. मूर्ती आणि सहसंचालक (यांत्रिकीकरण) डॉ. शिवकुमार हुक्केरी यांनी नुकतीच शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर फॉर एक्सलन्स आणि इनक्युबेशन इन सेरिकल्चरला भेट दिली. येथील विविध उपक्रमांचा आढावा घेतला.

विद्यापीठाच्या रेशीमशास्त्र विभागामार्फत मार्गदर्शन प्राप्त यळगूड (ता. हातकणंगले) येथील आप्पासो झुंजार, राजेंद्र बागल यांच्या रेशीम शेतीला भेट देऊन पाहणी केली. विद्यापीठाच्या रेशीम शास्त्रविषयक तंत्रज्ञान शेतकऱ्यांकडील कोषाची उत्पादकता आणि गुणवत्ता वाढीसाठी उपयोगी पडत असल्याबद्दल अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. विद्यापीठाच्या सेरिकल्चर इनक्युबेशन सेंटरच्या माध्यमातून संशोधन, प्रशिक्षण, नाविन्यपूर्ण संकल्पना आदींना भविष्यात सहकार्याचे आश्वासन शिष्टमंडळाने दिले. जिल्हा नियोजन समिती, केंद्रीय रेशीम मंडळ, वस्त्र मंत्रालय यांच्या सहकार्याने तुती लागवड ते कापड निर्मिती असे एकात्मिक मॉडेल विद्यापीठात उभे करण्याची तयारीही अधिकाऱ्यांनी दर्शवली.

अधिकाऱ्यांनी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची भेट घेऊन चर्चा केली. या प्रसंगी प्राणीशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. व्ही. एस. मन्ने, रेशीमशास्त्र सेंटरचे समन्वयक डॉ. ए. डी. जाधव उपस्थित होते.

# जीवाणूंतील प्रतिजैविक प्रतिकारक्षमतेवर संशोधन

## शिवाजी विद्यापीठ सूक्ष्मजीव शास्त्रज्ञांचे महत्त्वपूर्ण संशोधन : डॉ. के. डी. सोनवणे यांच्या चमूचे यश



**भविष्यवेधी संशोधन**

डॉ. के. डी. सोनवणे आणि त्यांच्या संशोधक चमूने जागतिक स्तरावर जगाला भेडसावू शकणाऱ्या एका महत्त्वपूर्ण आरोग्य समस्येचा वेध घेतला आहे. जीवाणूमध्ये निर्माण होणारी प्रतिजैविक प्रतिकारक्षमता ही भविष्यात मानवी आरोग्यासमोरील मोठी आव्हानात्मक समस्या आहे. त्यावरील उपायांसंदर्भातील हे संशोधन भविष्य महत्वाचे ठरणार आहे.

**- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरु शिवाजी विद्यापीठ.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

विविध रोगांना कारणीभूत असणाऱ्या जीवाणूंमध्ये निर्माण होत असलेली प्रतिजैविक प्रतिकारक्षमता ही आज जागतिक स्तरावर भेडसावणारी एक प्रमुख आरोग्यविषयक समस्या आहे. या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठाच्या सूक्ष्मजीवशास्त्र अधिविभागाच्या संशोधकांनी अत्यंत मूलभूत स्वरुपाचे संशोधन केले असून जीवाणूंमधील ही प्रतिजैविक प्रतिकारक्षमता निष्प्रभ करणे शक्य असल्याचे सिद्ध केले आहे. या संदर्भातील शोधनिबंध आंतरराष्ट्रीय विज्ञानपत्रिकांतून प्रसिद्ध झाले आहेत.

काय आहे संशोधन...

जीवाणूंमध्ये ही प्रतिजैविक प्रतिकारक्षमता कशी निर्माण होते, या दिशेने संशोधन केंद्रित करण्यात आले. या अंतर्गत जीवाणूंत प्रतिरोध निर्माण करणारे एक नवीन वितंचक (एन्झाईम) आढळून आले. त्या एन्झाईमचा सर्वकष अभ्यास या संशोधनांतर्गत करण्यात आला. इतकेच नव्हे, तर त्या एन्झाईमचा प्रतिरोध करू शकणाऱ्या सेंद्रिय रेणूचाही (इन्हिबिटर) सूक्ष्मजीवशास्त्रीय व बायोइन्फॉर्मेटिक्स पद्धतींचा वापर करून शोध लावण्यात यश प्राप्त झाले आहे. त्यामुळे भविष्यात एखाद्या रोगाच्या जीवाणूत प्रतिजैविक प्रतिकारक्षमता आढळल्यास त्यावर मात करण्यासाठी सदर संशोधन अत्यंत प्रभावी ठरणार आहे. सदरबाबतचे प्रोटीन सिंथेसिस व मॉलेक्युलर जेनेटिक स्तरावर देखील संशोधन करण्यात आले आहे.

सदर संशोधन जर्नल ऑफ सेल्युलर बायोकेमिस्ट्री, ब्राझिलियन जर्नल ऑफ मायक्रोबायोलॉजी, प्लॉस वन, जर्नल ऑफ प्लँट बायोकेमिस्ट्री अँड बायोटेक्नॉलॉजी, जर्नल ऑफ प्रोटीन्स अँड प्रोटीओमिक्स आणि जर्नल ऑफ इथनोफार्मोकोलॉजी इत्यादी संशोधन पत्रिकांतून प्रकाशित झाले आहे.

डॉ. सोनवणे यांच्यासमवेत डॉ. ऋषिकेश परुळेकर, डॉ. अस्मिता कांबळे, डॉ. एस.आर. वाघमारे, डॉ. एन.एच. नदाफ आणि सागर बराले या संशोधकांचे यात योगदान आहे.



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची केंद्रीय रेशीम संशोधन प्रशिक्षण संस्थेचे संचालक डॉ. पंकज तिवारी, सहसंचालक एम. मूर्ती, शिवकुमार हुक्केरी यांनी भेट घेतली. यावेळी व्ही. एस. मन्ने, ए. डी. जाधव, आदी उपस्थित होते.

# तुती लागवड ते कापड निर्मितीचे एकात्मिक मॉडेल उभारण्यास सहकार्य

## केंद्रीय रेशीम'ची तयारी : विद्यापीठातील उपक्रमांचा आढावा

■ लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सेरिकल्चर इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून संशोधन, प्रशिक्षण, नावीन्यपूर्ण संकल्पना, आदींना भविष्यात सहकार्य केले जाईल. जिल्हा नियोजन समिती, केंद्रीय रेशीम मंडळ, वस्त्र मंत्रालय यांच्या सहकार्याने तुती लागवड ते कापड निर्मिती असे एकात्मिक मॉडेल विद्यापीठात उभे करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची तयारी केंद्रीय रेशीम संशोधन प्रशिक्षण संस्थेच्या वरिष्ठ शास्त्रज्ञ, अधिकाऱ्यांनी दर्शविली.

केंद्रीय रेशीम संशोधन प्रशिक्षण संस्था आणि म्हैसूर येथील केंद्रीय रेशीम मंडळाचे संचालक डॉ. पंकज तिवारी, सहसंचालक एम. मूर्ती, शिवकुमार हुक्केरी यांनी विद्यापीठाच्या सेंटर फॉर एक्सलन्स आणि इन्क्युबेशन इन सेरिकल्चरला गेल्या आठवड्यात भेट दिली. येथे सुरू असलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. विद्यापीठाच्या रेशीमशास्त्र विभागामार्फत मार्गदर्शन प्राप्त यळगूड (ता. हातकणंगले) येथील आप्पासो झुंजार, राजेंद्र बागल यांच्या रेशीम शेतीची पाहणी केली. या अधिकाऱ्यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी प्राणिशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. व्ही.एस. मन्ने, रेशीमशास्त्र सेंटरचे समन्वयक डॉ. ए. डी. जाधव उपस्थित होते.

# अंतिम वर्षाच्या बॅकलॉग विद्यार्थ्यांची आजपासून परीक्षा

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : ऑक्टोबरमध्ये झालेल्या अंतिम सत्र, वर्षाच्या परीक्षेला गैरहजर राहिलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या पदवी आणि पदव्युत्तर बॅकलॉग विद्यार्थ्यांच्या परीक्षा शिवाजी विद्यापीठाकडून आज, गुरुवारी आणि उद्या, शुक्रवारी होणार आहेत. त्यासाठी १११८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. विविध २६९ विषयांच्या परीक्षा होतील.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षेमुळे (सीईटी) विद्यापीठाच्या अंतिम वर्ष, सत्राच्या परीक्षेला गैरहजर राहिलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा बुधवारी ऑनलाईन पद्धतीने झाली. त्यासाठी नोंदणी केलेल्या २३१ पैकी ४१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यात अधिकत्तर विद्यार्थी हे विधि (लॉ) अभ्यासक्रमाचे आहेत. ५० गुणांची एमसीक्यू स्वरूपात परीक्षा घेतली. सकाळी अकरा ते दुपारी बारा, दुपारी एक ते दोन आणि दुपारी तीन ते चार या सत्रांमध्ये परीक्षा झाली, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.